# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gamblers**

**Police Station** :- **Jaulka**

**Date of Good Work done** :- **06/01/2023**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. जऊळका पोलीसांचा जुगार अड्डयावर छापा ; 37 हजारांचा मुद्देमाल जप्त.

# जुगारअड्ड्यावर छापा

## 37 हजारांचा मुद्देमाल केला जप्त

**जऊळका रेल्वे** , (वा.). ठाणेदार प्रदीपकुमार राठोड यांना खबऱ्याद्वारे मिळालेल्या गोपनीय माहितीवरून ठाणेदार व पोलिस कर्मचाऱ्यांनी राजाकिन्ही व जऊळका रेल्वे येथे चालू असलेल्या जुगारावर धाड टाकून 6 जणांवर कारवाई करीत रोख रक्कम व मोबाईल मिळून 37 हजार 340 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.सद्यस्थितीत परिसरात यात्रा सुरू असून यात्रांमध्ये येणाऱ्या लोकांना जुगाराचे आमिष दाखवून सावज बनविणारे अनेक भामटे सक्रिय झाले होते.

याबाबतीत मिळालेल्या माहितीनुसार जऊळका रेल्वे पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रदीपकुमार राठोड यांना खबऱ्या कडून मिळालेल्या गोपनीय तसेच विश्वसनीय माहितीवरून त्यांच्या निर्देशानुसार पोलिस उपनिरीक्षक निरंजन वानखेडे, पोहेकॉं.सचिन कल्ले,नापोकॉं. सुनील काळदाते, पोकॉं. दीपक कावरखे,



रवि जवंजाळ, गणेश इंगळे, शिवाजी खिल्लारे, विष्णू इढोळे यांनी दोन पंचासह 3 जानेवारी रोजी जऊळका रेल्वे बस स्टॅण्ड येथील शिवनेरी पान टपरी मागे सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या जुगारावर छापा टाकून आरोपी नादर शाह बिस्मिल्ला शाह व संतोष पांडुरंग लोखंडे यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून 23 हजार 340 रुपयांची रोख व पत्त्यांची गड्डी असा मुद्देमाल जप्त केला.पोलिसाकडून विशेष मोहीम राबविल्या जात आहे.